# शासकीय तंत्रनिकेतन कोल्हापूर

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
विद्यानगर, कोल्हापूर ४१६००४
फोन – (०२३१) २५२१०३८, फॅक्स २५२१०१६
E-mail : gpkolhapur@yahoo.com


जा.क्रं.शातंनिको/विवि/२०२०-२१/डीबीटीपोर्टल/मुदतवाढ/ 1407 दि- 14 MAY 2021

**पाचवी अंतिम सूचना - अत्यंत महत्वाचे-**

**अंतिम दिनांक ३१-०५-२०२१.**

**प रि प त्र क -**

**विषय –** **शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मधील प्रथम ,व्दितीय व तृतिय वर्षातील सर्व शाखामधील महाडीबीटी प्रणालीमधील फॉर्म भरणे करीता मुदत वाढविण्यात आलेबाबत व आज पर्यंतही फॉर्म न भरलेल्या विद्यार्थ्यांनी अर्ज भरणे बाबत व लॉगीनमध्ये रिव्हर्ट केलेले (Sent Back) अर्जातील कागदपत्रांची पुर्तता त्वरीत करणे बाबत.(मुदतवाढ दि ३१/०५/२०२१)**

**संदर्भ –** १) या कार्यालयाचे परिपत्रक क्रं ११६६. दि ०१/०१/२०२१.
२) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रं १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२१/१६०. दि ०३/०५/२०२१.

वरील विषयास अनुसरुन संस्थेतील सर्व शाखामधील सर्व प्रवर्गाच्या ( EBC/SEBC/EWS, OBC, ST, SC,VJNT,SBC,MINORITY ) विद्यार्थ्याकरीता महाडीबीटी प्रणालीमधील अर्ज भरण्याकरीता दि १५/०४/२०२१ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली होती. तरी महाडीबीटी प्रणाली व संदर्भाकित पत्रानुसार फॉर्म भरणे करीता - **अंतिम दि ३१/०५/२०२१ पर्यंत मुदत वाढ देण्यात आलेली आहे** .

तसेच ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज रिव्हर्ट केलेले **(Sent Back)** आहेत, त्यांनीही **अंतिम दि ३१/०५/२०२१** पर्यंत अर्जातील कागदपत्रांची पुर्तता त्वरीत करुन अर्ज पुन्हा महाडीबीटी प्रणालीव्दारे मंजुरीकरीता पाठविण्यात यावेत, अन्यथा भविष्यात उदभवणा-या अडचणीस सर्वस्वी संबंधित विद्यार्थी जबाबदार राहतील व **रु** ३०००/- किंवा **रु** ६०००/- शिक्षण शुल्क भरण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यार्थ्याची राहील याची नोंद घ्यावी.

**तसेच ज्या विद्यार्थ्यांचे स्वतःचे बँक खाते आधार कार्डशी लिंक नाही अशा विद्यार्थ्यांनी त्वरीत आधार कार्ड स्वतः च्या बँक खात्याशी लिंक करावे अन्यथा शिष्यवृत्तीची रक्कम त्यांचे खात्यावर जमा होणार नाही याची नोंद घ्यावी.**

सर्व प्रवर्गाच्या विद्यार्थ्यानी त्रुटी पाहण्याकरीता सुचना खालील प्रमाणे ...

**My Applied Scheme ⇨ Application ID**

वर क्लिक करुन मेसेज बॉक्स मध्ये शेवटी ज्या त्रुटी दिलेल्या आहेत त्या दुरुस्त करुन फॉर्म पुन्हा Reapply करावा . Server Down असल्याने लगेच त्रुटी दिसत नाहीत तरी ४-५ वेळा प्रयत्न केल्यावर त्रुटी दिसतात.

**तसेच विद्यार्थ्यांनी केंद्र शासनाच्या व महाराष्ट्र शासनाच्या योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभ घेणेचा आहे याची नोंद घ्यावी.**

प्राचार्य,
**शासकीय तंत्रनिकेतन ,कोल्हापूर.**

प्रत- मुख्य सूचना फलकावर विद्यार्थ्याचे माहितीसाठी व पूढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

**प्रत- श्री. इंगळे, प्रोग्रामर यांना संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी.**

श्री इंगळे
१४/५/२१